


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on




E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १४ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# अमरावती,अकोला जिल्ह्यात काँग्रेसला मोठं भगदाड!

## बड्या नेत्यासह १९ नगरसेवकांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

विदर्भातील राजकीय समीकरणांना कलाटणी देणाऱ्या घडामोडीत अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर नगर परिषदेच्या काँग्रेसच्या नगराध्यक्षा मंदाकिनी भारसाकळे, नगर परिषदेचे १९ नगरसेवक, तसेच अकोल्यातील ज्येष्ठ नेते रामदास बोडके यांचे पुत्र दीपक बोडके आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह प्रहार संघटना, शौर्य सेना, आजाद समाज पक्ष आणि कर्नाटकातील बेळगाव येथील अनेक पदाधिकारी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

या प्रवेशामुळे दर्यापूर नगर परिषदेतील काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा असून विदर्भात शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी बळकट झाल्याचे मानले जात आहे. त्याचप्रमाणे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. राज बोरकर, संदीप मेश्राम, सचिन कुंभारे, केतन सहारे, पंकज बोरकर आणि श्रीकांत रामटेके, प्रहारचे बेळगाव जिल्हाध्यक्ष शिवकुमार बोधले, बेळगाव तालुका अध्यक्ष दीपक बोधले, युवा अध्यक्ष बेळगाव जिल्हा रोहित




पाटील, मांगुर शाखाप्रमुख सुरेश हेमाजे यांच्यासह अन्य पदाधिकारी सदस्य कार्यकर्त्यांनी ही शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

मुंबई स्थित नंदनवन या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या प्रवेश सोहळ्यात बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नव्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे स्वागत करत स्पष्ट शब्दांत सांगितले की, दर्यापूरच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि विकासकामांना महायुती सरकारची संपूर्ण साथ राहील. शिंदे यांनी बच्चू कडू यांच्या कार्याचे विशेष कौतुक करत सांगितले की, विदर्भात सर्वसामान्य, शेतकरी, दिव्यांग आणि वंचित घटकांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला आहे. त्यामुळे विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेकडे वाढता ओढा हा जनविश्वासाचा पुरावा असल्याचे त्यांनी नमूद केले.

बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली विदर्भात सुरू असलेली संघटनवाढ आणि या सामूहिक प्रवेशामुळे आगामी स्थानिक राजकारणात शिवसेनेचे बळ अधिक वाढण्याचे संकेत मिळत आहेत. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार तथा माजी मंत्री बच्चू कडू, आमदार मनीषा कायंदे, अमरावती जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सुधाकरराव भारसाकळे, यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना एकनाथ शिंदेंचीच: २०२४ च्या विधानसभा निकालाने लोकन्यायालयाचे शिक्कामोर्तब

## सुप्रीम कोर्टही हाच निर्णय देईल असा विश्वास - मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ जालना-** सध्या सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हावर अत्यंत महत्त्वाची सुनावणी सुरू आहे. गुरुवारी ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केल्यानंतर, आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर मोठी प्रतिक्रिया दिली आहे. सर्वोच्च न्यायालय यावर आपला निर्णय देईलच, मात्र त्यापूर्वीच २०२४च्या विधानसभा निवडणुकीत 'लोकन्यायालयाने' शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच असण्यावर शिक्कामोर्तब केले आहे, असे ठाम मत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जालना येथे माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केले. या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी शिवसेना पक्षनाव, राहुल गांधींवर टीका, चाकण एमआयडीसीचा प्रश्न आणि जातनिहाय जनगणना अशा विविध मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केले.

**सुप्रीम कोर्टही हाच निर्णय देईल-** सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हे संपूर्ण प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे आणि न्यायालय त्यावर योग्य तो निर्णय देईल. पण त्यापूर्वीच या राज्याच्या लोकन्यायालयाने २०२४च्या विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून आपला निर्णय दिला आहे. शिवसेना ही सन्माननीय एकनाथराव शिंदे यांची आणि राष्ट्रवादी काँग्रेस ही अजितदादा



पवार यांचीच आहे, यावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे. आता सुप्रीम कोर्ट काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष असले, तरी सुप्रीम कोर्टदेखील हाच निर्णय देईल अशी आम्हाला पूर्ण अपेक्षा आहे.

**चाकण MIDC आणि शरद पवारांच्या टीकेला उत्तर**

शरद पवार यांनी चाकण औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या स्थलांतरावरून आणि महाराष्ट्रातील ३६ हजार कंपन्या बंद पडल्याच्या मुद्द्यावरून सरकारवर टीका केली होती. यावर फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले, पवार साहेब हे ज्येष्ठ नेते आहेत आणि ते नेहमी महाराष्ट्रहिताचा विचार करतात. त्यांच्यापर्यंत चुकीची माहिती जाऊ नये म्हणूनच मी 'एक्स'वर (ट्विटर) सविस्तर उत्तर दिले आहे. देशात सर्वाधिक आणि सक्रिय कंपन्या आजही महाराष्ट्रातच आहेत. ज्या कंपन्या कधी सुरूच होऊ शकल्या नाहीत, त्यांचा आकडा देऊन काही लोक फसवेगिरी करत असल्याचे हि मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**राहुल गांधींवर टीका- असा छिचोरपणा गल्लीतले नेतेही करत नाहीत**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अत्यंत शेलक्या शब्दांत टीका केली. राहुल गांधी यांनी जो 'छिचोरपणा' केला, तो कुठल्याही परिस्थितीत अशोभनीय आहे. अशा प्रकारचा छिचोरा नेता भारताने यापूर्वी कधीही पाहिला नव्हता. त्यांनी केवळ देशाच्या पंतप्रधानांचाच अपमान केला नाही, तर इटलीच्या महिला राष्ट्रप्रमुखाचाही अत्यंत खालच्या दर्जाला जाऊन अपमान केला आहे. गल्लीतले नेतेदेखील अशा पद्धतीने वागत नाहीत. राहुल गांधी आणि संदीप दीक्षित यांनी या कृत्याबद्दल संपूर्ण देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली.

# राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी!

## येत्या २ ते ४ दिवसांत बँक खात्यात जमा होणार कर्जमाफीचे पैसे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४वाशीम-** राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची प्रक्रिया सध्या वेगात सुरू आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जात आहे. मात्र, अद्यापही राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कर्जमाफीचे पैसे प्रत्यक्ष जमा न झाल्यामुळे, मदतीच्या प्रतीक्षेत असलेला बळीराजा सध्या चिंतेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्यांच्या या परिस्थितीवर राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे बोलताना एक महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक माहिती दिली आहे. येत्या दोन ते चार दिवसांत कर्जमाफीचे सुमारे पाच ते दहा हजार कोटी रुपये थेट



शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातील, अशी मोठी घोषणा त्यांनी केली आहे. कृषिमंत्र्यांच्या या आश्वासनामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो शेतकऱ्यांना आता मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सध्या 'ग्रीस्टॅक' प्रणालीच्या माध्यमातून कर्जमाफीच्या याद्या पडताळणीचे काम प्रगतीपथावर असून, शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याने जसजशा याद्या अद्ययावत होतील, तसतशी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. या संपूर्ण कर्जमाफी योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना एकूण ४० हजार ५८५ कोटी रुपयांचा मोठा लाभ होणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे दिली.

वाशिम येथे पत्रकारांशी संवाद साधताना, शहरी भागातील शेतकऱ्यांना सिंचन विहीर आणि इतर कृषी योजनांचा लाभ मिळत नसल्याची बाब पत्रकारांनी निदर्शनास आणून दिल्यावर दत्तात्रय भरणे यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली. या समस्येबाबत आपल्याला पूर्वकल्पना नसल्याची कबुली देत, येत्या काळात शहरी भागातील शेतकऱ्यांनाही शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळावा यासाठी योग्य ती तरतूद निश्चितपणे केली जाईल, असे महत्त्वपूर्ण आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# विनायक मेटेंच्या मृत्यूप्रकरणात ज्योती मेटे यांचा चालकावर संशय

## न्यायालयीन प्रक्रियेला होत असलेल्या विलंबाबाबतही सवाल उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४मुंबई-** दिवंगत लोकनेते आणि माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघात प्रकरणात नवीन ट्विस्ट आलाय. विनायक मेटे यांच्या पत्नीने त्यांच्या मृत्यूप्रकरणी संशय व्यक्त केला आहे. विनायक मेटे यांच्या अपघात प्रकरणातील संशय, न्यायालयीन प्रक्रियेला होत असलेला विलंब आणि संबंधित व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांमुळे हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. विनायक मेटे यांच्या निधनाला चार वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त बीडमधील स्मृतीस्थळावर आज अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी मेटे यांच्या अपघात प्रकरणावरून गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. विनायक मेटे यांच्या अपघात प्रकरणी त्यांच्या चालकावर ज्योती मेटे यांनी संशय व्यक्त केलाय. विनायक मेटे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त बोलताना ज्योती मेटे यांनी मेटे यांच्या अपघातातील चालकावर सुरुवातीपासूनच संशय असल्याचं सांगत, संबंधित आरोपी न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान वारंवार गैरहजर राहत असल्याचा आरोपही त्यांनी केला.




न्यायालयीन प्रक्रियेचा आम्ही आदर करतो; मात्र आरोपी सतत गैरहजर राहत असल्याने अद्याप चार्ज फ्रेम झालेला नाही, असे त्यांनी म्हटले.दुसरीकडे चालक हा सामाजिक जीवनात सक्रिय दिसतोय. त्याच्याकडे गाड्या आहेत. तो बैलगाडा शर्यती आयोजित करतो. परंत त्याच्याकडे शर्यती आयोजित करण्यासाठी पैसा कुठून येतो, याचाही गांभीर्याने तपास झाला पाहिजे, अशी मागणी ज्योती मेटे यांनी आज केली. या सर्व मुद्द्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, मेटे साहेबांच्या निधनानंतर महायुतीच्या सत्तेत शिवसंग्रामला अपेक्षित वाटा मिळाला नाही, याची खंत कार्यकर्त्यांमध्ये असल्याचेही ज्योती मेटे यांनी बोलून दाखवले. दरम्यान, मेटे साहेबांच्या निधनानंतर महायुतीच्या सत्तेत शिवसंग्रामला अपेक्षित वाटा मिळाला नाही, याची खंत कार्यकर्त्यांमध्ये असल्याचेही ज्योती मेटे यांनी बोलून दाखवले.

# राहुल गांधी वारंवार 'पप्पू'च्याच भूमिकेत त्यांच्यातला बालिशपणा अजूनही गेलेला नाही

## प्रवीण दरेकरांचा काँग्रेसवर घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४मुंबई-** काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी टीका केली आहे. राहुल गांधी यांच्यात अद्यापही सुधारणा होण्याची कोणतीही लक्षणे दिसत नसून, ते वारंवार 'पप्पू'च्याच भूमिकेत वावरताना दिसत आहेत. त्यांच्यातला बालिशपणा अजूनही गेलेला नाही, असा सणसणीत टोला प्रवीण दरेकर यांनी लगावला आहे.

राहुल गांधी यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना दरेकर म्हणाले की, खालच्या पातळीवर जाऊन टीका केल्याने राहुल गांधी किंवा त्यांच्या काँग्रेस पक्षाला काहीही साध्य होणार नाही. तुम्ही एखादा महत्त्वाचा विषय किंवा अजेंडा हाती घेऊन काम केले, तर कदाचित काँग्रेसला थोडीफार उभारी मिळण्यास मदत होऊ शकेल. परंतु, केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली की आपले भले होईल, या भ्रमात त्यांनी राहू नये, असा सल्लाही दरेकरांनी दिला.



राहुल गांधींच्या वक्तव्यांचा समाचार घेताना दरेकरांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, परदेशी महिलेविषयी विकृत बोलले की आपल्याला खूप प्रसिद्धी मिळेल, असे त्यांना वाटते. पण आपला देश हा अत्यंत व्यापक भूमिका घेणारा देश आहे. अशा प्रकारची बेताल वक्तव्ये करणे हे आपल्या संस्कृतीला छेद देणारे आहे.

राहुल गांधी हे आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते आहेत, याकडे लक्ष वेधत दरेकर म्हणाले की, संविधानिक पदावर बसलेल्या कोणत्याही व्यक्तीने असे निराधार आणि बेजबाबदारपणे बोलणे अजिबात योग्य नाही.

# महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ मुंबई :** भारताची जागतिक नेतृत्वाच्या दिशेने तर महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईतील ताज हॉटेल येथे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राजनैतिक अधिकारी, वाणिज्यदूत, विविध देशांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांचे स्वागत केले.भारताची प्रगती, महाराष्ट्राची आर्थिक ताकद आणि भविष्यातील विकासदृष्टी यांचा यावेळी त्यांनी आढावा घेतला.

महाराष्ट्र हे देशातील पहिले ट्रिलियन डॉलर्सचे उपराष्ट्रीय अर्थकारण असलेले राज्य बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून २०२९-३० पर्यंत हे उद्दिष्ट साध्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. भारत अधिक न्याय्य, समावेशक आणि समन्वयाधारित जागतिक व्यवस्थेच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देत राहील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री यांच्या पत्नी अमृता फडणवीस, विविध देशांचे महावाणिज्य दूत, कौन्सुलर कॉर्प्सचे डीन आणि पोलंडचे महावाणिज्य दूत थॉमस, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मंत्री छगन भुजबळ, मंगलप्रभात लोढा, आदिती तटकरे, राज्यमंत्री योगेश कदम, महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी यावेळी



उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक असून समावेशकता, सहिष्णुता आणि विविध विचारांचा स्वीकार ही देशाची वैशिष्ट्ये आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका बजावणारा देश म्हणून उदयास येत आहे. जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने स्थान प्राप्त केले असून लवकरच पाच ट्रिलियन डॉलर्सपेक्षा मोठ्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या दशकात भारताने गरिबी निर्मूलन, पायाभूत सुविधा विकास, नवकल्पना, तंत्रज्ञान आणि मानव संसाधन निर्मिती या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. भारतीय प्रतिभेने केवळ देशातीलच नव्हे तर जागतिक उद्योगविश्वालाही दिशा दिली आहे. हा नवा भारत विकासाचे नवे मानदंड निर्माण करीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

तसेच वाढवण बंदर ते विरार या परिसरात 'चौथी मुंबई' विकसित करण्याची संकल्पना पुढे नेण्यात येत असून देशातील पहिले ऑफशोअर विमानतळ आणि मुंबई महानगर क्षेत्रातील तिसरे विमानतळ पालघर जिल्ह्यात उभारण्याची राज्याची महत्वाकांक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.-



## संपादकीय ......

# कोचिंग क्लासेसच्या मनमानीला चाप

*शिक्षणाच्या स्पर्धेत शाळेच्या वर्गखोलीनंतर दुसरी महत्त्वाची जागा निर्माण झाली आहे ती खासगी कोचिंग क्लासची. चांगले गुण, प्रवेश परीक्षा, स्पर्धा परीक्षा आणि भविष्यातील करिअर यासाठी पालक आपल्या मुलांना मोठ्या अपेक्षेने या वर्गांकडे पाठवतात. मात्र या वाढत्या क्षेत्रावर पुरेसे नियंत्रण नसल्याने शुल्क, विद्यार्थ्यांची संख्या, सुरक्षेच्या उपाययोजना, शिक्षकांची गुणवत्ता आणि पालकांशी व्यवहार याबाबत अनेक प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने खासगी कोचिंग क्लासेससाठी स्वतंत्र कायदा करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे एका बाजूला पालकांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली असली, तरी दुसर्या बाजूला या क्षेत्रातील चालक-मालकांमध्ये नव्या नियमांच्या वाढत्या जाचाची चिंता व्यक्त होऊ शकते.*

*शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात खासगी कोचिंग क्लासेसच्या मनमानीला आळा घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला आहे. हा मसुदा शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून त्यावर पालक, विद्यार्थी, शिक्षक तसेच कोचिंग क्लास चालक-मालकांकडून हरकती आणि सूचना मागविण्यात येणार आहेत. त्यामुळे हा कायदा अंतिम होण्यापूर्वी संबंधित सर्व घटकांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणार आहे. प्रस्तावित कायद्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खासगी कोचिंग क्लासेसची नोंदणी बंधनकारक करण्याचा निर्णय. आतापर्यंत अनेक ठिकाणी क्लास सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींचे पालन होत नव्हते. काही ठिकाणी अपुर्या जागेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना बसवले जाते. काही ठिकाणी अग्निसुरक्षा किंवा आपत्कालीन स्थितीत बाहेर पडण्याची व्यवस्था अपुरी असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे क्लासची जागा सुरक्षित असणे, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची परवानगी, अग्निशमन दलाची मान्यता आणि पोलिसांशी संबंधित आवश्यक बाबी पूर्ण करणे बंधनकारक करण्यामागे निश्चितच विद्यार्थी सुरक्षेचा हेतू आहे.*

*या कायद्याची व्याप्तीही महत्त्वाची आहे. आतापर्यंत कोचिंग क्लासेससंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वांचा भर प्रामुख्याने अकरावी, बारावी आणि स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांवर होता. मात्र प्रस्तावित कायद्यानुसार तेराव्या वर्षावरील विद्यार्थ्यांपासून, म्हणजे साधारण आठवीपासूनच, हे नियम लागू होणार आहेत. यामुळे शालेय शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच खासगी शिकवणीच्या वाढत्या प्रभावावर नियंत्रण ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न दिसतो. पालकांच्या दृष्टीने सर्वात मोठा प्रश्न असतो तो शुल्काचा. एका वर्षासाठी किती शुल्क आकारायचे, कोणत्या पद्धतीने घ्यायचे आणि त्याबदल्यात विद्यार्थ्यांना नेमक्या कोणत्या सुविधा द्यायच्या, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. प्रस्तावित नियमांनुसार सरकारने ठरवून दिलेल्या स्वरूपातच शुल्क स्वीकारावे लागणार असून पालकांना त्याची पावती देणे बंधनकारक असेल. त्यामुळे शुल्काबाबत पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे. रोख स्वरूपातील शुल्क व्यवहारांवर निर्बंध आणण्याचाही प्रस्ताव आहे. यामुळे व्यवहारांची नोंद राहील आणि पालकांकडून घेतलेल्या शुल्काचा स्पष्ट हिशेब ठेवणे क्लास चालकांना भाग पडेल. भविष्यात शुल्काबाबत वाद निर्माण झाल्यास पालकांकडे व्यवहाराचा पुरावाही उपलब्ध राहू शकतो. विद्यार्थ्यांची संख्या आणि शिक्षक-विद्यार्थी प्रमाणाची माहिती सरकारकडे देण्याची तरतूदही महत्त्वाची आहे.विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत प्रस्तावित तरतुदी अधिक कठोर आहेत. वर्गात आणि मोकळ्या जागेत चित्रण करणारी यंत्रणा बसविण्याची अट, विद्यार्थ्याला मारहाण, छेडछाड किंवा बालकांच्या लैंगिक संरक्षणासंबंधी गंभीर गुन्हा घडल्यास पोलिसांत तक्रार करण्याची जबाबदारी, तसेच नियम मोडणार्या क्लासची पुस्तके, नोट्स, संगणकीय कार्यक्रम आणि अन्य साहित्य जप्त करण्याची तरतूद यामुळे क्लास व्यवस्थापनावर मोठी जबाबदारी येणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांवरील अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ही बाब महत्त्वाची आहे. पालक आपली मुले काही तास क्लास व्यवस्थापनाच्या देखरेखीखाली सोपवत असतात. त्यामुळे शाळेप्रमाणेच खासगी कोचिंग संस्थांनीही विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. केवळ चांगले निकाल देणे म्हणजे चांगले शिक्षण नव्हे; विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण देणेही तितकेच आवश्यक आहे. मात्र या कायद्याची दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही.*

*खासगी कोचिंग क्षेत्रात मोठ्या संस्था आहेत, तसेच अत्यंत मर्यादित साधनसामग्रीवर चालणारे छोटे क्लासही आहेत. सर्वांवर समान नियम लादताना त्यांच्या आर्थिक क्षमतेचा विचार करावा लागेल. अग्निसुरक्षा, चित्रण यंत्रणा, विविध परवानग्या, नोंदणी, कागदपत्रे आणि इतर अटी पूर्ण करण्याचा खर्च वाढला, तर त्याचा भार शेवटी विद्यार्थ्यांच्या शुल्कावर पडण्याची शक्यता आहे. छोट्या क्लास चालकांसमोर आणखी एक प्रश्न आहे तो नियमांची गुंतागुंत. एखादा शिक्षक स्वतःच्या घराजवळ किंवा छोट्या जागेत काही विद्यार्थ्यांना शिकवत असेल आणि त्यालाही मोठ्या संस्थांप्रमाणेच सर्व अटी लागू झाल्या, तर त्याच्यासाठी स्वतंत्रपणे व्यवसाय चालवणे अवघड होऊ शकते. त्यामुळे नियम करताना मोठ्या व्यापारी कोचिंग संस्थांबरोबरच लहान आणि प्रामाणिकपणे काम करणार्या शिक्षकांचाही विचार होणे आवश्यक आहे.दंडाची तरतूदही गंभीर आहे. कायद्याचे उल्लंघन करणार्यांना पन्नास लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर उल्लंघनांना कठोर शिक्षा असायलाच हवी; मात्र किरकोळ प्रशासकीय त्रुटी आणि विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण करणारे गंभीर उल्लंघन यांच्यात स्पष्ट फरक असणे गरजेचे आहे. अन्यथा दंडाची भीती नियंत्रणापेक्षा दडपणाचे साधन बनू शकते. खरे तर सरकारने या कायद्याकडे केवळ नियंत्रणाचे साधन म्हणून न पाहता शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकता वाढविण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. पालकांना शुल्क, सुविधा, शिक्षकांची पात्रता, विद्यार्थ्यांची संख्या आणि सुरक्षिततेची माहिती सहज उपलब्ध झाली पाहिजे. क्लास चालकांनाही कोणत्या नियमांचे पालन करायचे, त्यासाठी किती कालावधी मिळणार आणि कोणत्या अधिकार्यांकडून कोणती परवानगी घ्यायची, याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे.*

# जुनी सेवार्थप्रणाली २० ऑगस्टपासून होणार बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

लेखा व कोषागारे संचालक कार्यालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जुनी सेवार्थप्रणाली येत्या २० ऑगस्टला बंद करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयाशी संबंधित आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे. नवीन सेवार्थप्रणालीच्या प्रभावी व सुरळीत अंमलबजावणीसाठी संबंधित कार्यालयांची डाटा मायग्रेशन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व डीडीओंनी आपल्या कार्यालयाची डाटा मायग्रेशन प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करून घ्यावी. ही प्रक्रिया करताना कोणतीही तांत्रिक अडचण अथवा समस्या उद्भवल्यास त्या प्रलंबित न ठेवता कोषागार कार्यालयातील संबंधित तज्ज्ञांकडून तत्काळ मार्गदर्शन घेऊन सोडवून घ्याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. जुनी सेवार्थप्रणाली बंद होण्यापूर्वी संबंधित कार्यालयांनी पायलट बील सादर करण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करून नवीन सेवार्थप्रणालीमध्ये कामकाज सुरळीतपणे सुरू होण्यासाठी आवश्यक ती तयारी करून ठेवावी. २० ऑगस्ट २०२६ नंतर जुनी सेवार्थप्रणाली उपलब्ध राहणार नसल्याने आवश्यक असलेली कोणतीही कार्यवाही प्रलंबित राहणार नाही. अंतिम मुदतीपूर्वी सर्व आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधितानी परस्पर समन्वयाने काम करावे. नवीन सेवार्थप्रणालीच्या अंमलबजावणी दरम्यान कामकाजात कोणताही व्यत्यय येऊ नये आणि वेतनासह संबंधित आर्थिक कामकाज सुरळीतपणे पार पडावे, यासाठी सर्व संबंधितांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे, असेही आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांनी केले.

# वरुड सर्वोत्कृष्ट पोलिस ठाणे उत्कृष्ट तपास करणाऱ्यांचा गौरव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४वरुड-** जिल्ह्यातील ३१ पोलिस ठाण्यांपैकी जुलै २०२६ मध्ये वरुडचे ठाणेदार यांनी उत्कृष्ट कामकाज केल्याने त्यांचा पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी प्रशस्तिपत्र व गौरवचिन्ह देऊन सत्कार केला. आयोजित एका समारंभात वरुडचे ठाणेदार अशोक जाधव यांच्यासह इतरही ठाण्यातील कर्मचारी व अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. मोर्शी पोलिसांनी तांत्रिक पुराव्याचे विश्लेषण करून गुन्हा उघडकीस आणला. तसेच खोलापूर पोलिसांनीही अशाच पद्धतीचा दुसरा गुन्हाही उघडकीस आणला होता. त्यामुळे मोर्शी व खोलापूरचे पोलिस अधिकारी तसेच तपास कर्मचाऱ्यांचाही यावेळी एसपींनी सत्कार केला. स्थानिक गुन्हे शाखेने लोणी ठाण्यात दाखल गुन्ह्याचा तपास केला. लूटमार करणाऱ्या पाच जणांची निश्चिती करून तिघांना अटक केली होती व लोणीहद्दीत लाखोंचा गांजा जप्त केला होता. त्यांचाही पोलिस अधीक्षकांनी गौरव केला. शिवाय ग्रामीण पोलिसांनी महिलांविरुद्धचे गुन्हे २४ तासांत उघडकीस आणले. पकड व अटक वॉरंटची तत्काळ अंमलबजावणी करणे, सीसीटीएनएसमध्ये गुणत्तापूर्वक गुन्ह्यांचा तपास, अवैध गांजा, दारू विक्रेत्यांवर वचक निर्माण करणे, हरविलेल्या मुलींचा शोध घेऊन कुटुंबीयांच्या स्वाधीन केल्याची उल्लेखनीय कामगिरीसुद्धा केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभाला अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवार उपस्थित होते.

# अमरावतीच्या नायब तहसीलदार टिना चव्हाण निलंबित

## जमिनीच्या व्यवहारात अधिकाराचा गैरवापर केल्याप्रकरणी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

अमरावती तहसील कार्यालयातील महसूल नायब तहसीलदार टिना चव्हाण यांना राज्य शासनाचा आदेश धडकताच निलंबित करण्यात आले. बडनेरा रोडवरील मौजे निंभोरा खुर्द येथील अकृषक जमिनीबाबत अधिकाराचा गैरवापर करून नियमबाह्य आदेश पारित केल्याप्रकरणी त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली.

शासकीय आदेशानुसार, मौजे निंभोरा खुर्द येथील सर्व्हे नंबर ५६/१-ब (क्षेत्र ०.९२ हेक्टर आर) या अकृषक जमिनीला कुळ कायदा लागू होत नाही. शिवाय याबाबतचे कायदेशीर अधिकार केवळ तहसीलदारांना आहेत. असे असतानाही नायब तहसीलदार टिना चव्हाण यांनी ३० मार्च २०२६ रोजी अनाधिकाराने आदेश पारित करून कुळास जमीन खरेदीचे अधिकार दिले होते.हा निर्णय घेताना त्यांनी उच्च व सर्वोच्च न्यायालयातील पूर्वलक्षित वाद, जुने फेरफार आणि इतर आवश्यक कायदेशीर कागदपत्रांची कोणतीही पडताळणी केली नाही. तसेच विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करता नियमबाह्य काम केले. त्यांची ही कृती शासकीय लोकसेवकास अशोभनीय असून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ चे उल्लंघन करणारी ठरली आहे.या गंभीर गैरवर्तणुकीमुळे श्रीमती चव्हाण यांच्याविरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. दरम्यान, या नियमातील ४ (१) (अ) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून शासनाने त्यांना तात्काळ



प्रभावाने निलंबित केले आहे.निलंबन काळात त्यांचे मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय निश्चित करण्यात आले असून, जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही. शिवाय या काळात खाजगी नोकरी अथवा व्यवसायही करता येणार नाही. तसे केल्यास नियमभंग केल्याच्या आरोपावरुन त्यांच्यावर आणखी कारवाई केली जाऊ शकेल. त्यांचा निलंबन निर्वाह भत्ताही रोखला जाणार आहे.

या गैरप्रकाराचा आरोप झाल्यापासून ते निलंबनाची कारवाई होईस्तोवर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी अत्यंत कठोरपणे या प्रकरणाचा पाठपुरावा केला. गेल्या महिन्यातच त्यांनी यासंदर्भातील शिफारशी शासनाकडे पाठविल्या होत्या. एवढेच नव्हे तर या प्रकरणाच्या अनुषंगाने सतत शासनासोबत त्यांचा पत्रव्यवहारही सुरू होता.या प्रकरणात २०१४-१५ मध्ये मूळ मालकांच्या वारसांची दिशाभूल करून आणि ५० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर बनावट दानपत्र दाखवून जमिनीचा मोठा भाग हडपण्याचा प्रयत्न केला गेला होता. दरम्यान, पुराव्यांअभावी हा दावा रद्द झाला असतानाही, कागदपत्रांमधील फेरफार आणि बनावट नोंदींचा आधार घेत महसूल खात्यातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून हा व्यवहार केला गेला.

# चांदूर बाजारचे विश्रामगृह 'पांढरा हत्ती'

## नूतनीकरणानंतरही बंदच, कर्मचाऱ्यांअभावी सेवा सुरूच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चांदुर बाजार -** सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखो रुपये खर्चून उभारलेले आणि नुकतेच पुन्हा नूतनीकरण केलेले चांदूरबाजार येथील शासकीय विश्रामगृह वर्षानुवर्षे बंद असल्याने शासनाच्या निधीच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नूतनीकरणासाठी पुन्हा लाखो रुपये खर्च करूनही विश्रामगृह नागरिक व शासकीय अधिकाऱ्यांच्या सेवेत आलेले नसल्याने लोकविकास संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त करीत तातडीने ते सुरू करण्याची मागणी केली आहे. चांदूरबाजार येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह उभारण्यासाठी सुरवातीला शासकीय जागेची अडचण होती. त्यावेळी अचलपूर विधानसभा मतदारसंघाच्या तत्कालीन आमदार तथा राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांनी स्वतःच्या मालकीची जमीन शासनाला दान दिल्याची माहिती स्थानिक स्तरावर सांगितली जाते. त्यानंतर या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाचे



विश्रामगृह तसेच उपविभागीय अभियंत्यांचे कार्यालय उभारण्यात आले. शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध प्रशासकीय कामानिमित्त चांदूरबाजार येथे येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी हे विश्रामगृह उभारण्यात आले होते. मात्र, इमारत पूर्ण झाल्यानंतरही ती नियमितपणे सुरू झाली नाही. दीर्घकाळ बंद असल्याने इमारतीची दुरवस्था झाली. त्यानंतर शासनाने पुन्हा लाखो रुपयांचा निधी खर्च करून नूतनीकरण केले. मात्र, नूतनीकरणानंतरही विश्रामगृह कुलूपबंदच असल्याने या खर्चाच्या औचित्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. जनतेच्या करातून उभारलेल्या शासकीय इमारतींचा नियमित वापर होणे अपेक्षित असताना चांदूरबाजारचे विश्रामगृह वर्षानुवर्षे बंद असल्यामुळे शासनाचा निधी खर्च होऊनही त्याचा उद्देश साध्य झालेला नाही, अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. लोकविकास संघटनेने विश्रामगृहाच्या मूळ बांधकामासाठी झालेला खर्च, देखभाल व दुरुस्तीवरील खर्च, नुकत्याच झालेल्या नूतनीकरणासाठी मंजूर व खर्च झालेला निधी आणि विश्रामगृह बंद ठेवण्यामागील कारणांची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रशासकीय किंवा तांत्रिक अडचणी असल्यास त्या तातडीने दूर करून विश्रामगृह सुरू करावे, अन्यथा झालेल्या खर्चाची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास लोकविकास संघटनेच्या वतीने लक्षवेधी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# अवाजवी शुल्कवाढ तातडीने कमी करावी; कुलगुरुंना घातले साकडे

## मागणी मान्य न झाल्यास एआयएसएफचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने विविध परीक्षा व शैक्षणिक शुल्कांमध्ये केलेली अवाजवी वाढ तातडीने कमी करावी, अशी मागणी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) ने केली आहे. यासंदर्भात सिनेट सदस्य कैलास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांना साकडे घालण्यात आले. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

विद्यापीठ प्रशासनाने अलिकडेच डुप्लिकेट मार्कशीट, मायग्रेशन सर्टिफिकेट, डिग्री, अग्रेशन सर्टिफिकेट तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित विविध शुल्कांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. ही वाढ झाल्याने विद्यार्थ्यांवर आर्थिक बोजा पडत आहे. त्यामुळेच विद्यापीठाने शुल्कवाढीचा फेरविचार करून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

दरम्यान कुलगुरुंशी झालेल्या चर्चेअंती विद्यार्थ्यांना होत असलेल्या त्रासाचा पाढाही वाचण्यात आला. त्यामुळेच विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून वाढीव शुल्क तातडीने कमी करावे, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान मागणी मान्य न झाल्यास एआयएसएफच्या माध्यमातून आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारादेखील सिनेट सदस्य कैलास चव्हाण यांनी दिला.यावेळी एआयएसएफच्या राज्य सचिव प्रतीक्षा ढोके, इतर पदाधिकारी योगेश चव्हाण, शुभम शेरेकर आदी उपस्थित होते.

तरतुदीपेक्षा अधिक वाढीमुळे अडचण दर दोन वर्षांनी नियमानुसार १० टक्के शुल्कवाढ करण्याची तरतूद असताना त्यापेक्षा मोठ्या प्रमाणात शुल्कवाढ करण्यात आली आहे. एवढी वाढ करणे योग्य नाही. विशेषतः डुप्लिकेट मार्कशीट व मायग्रेशन सर्टिफिकेटसारख्या आवश्यक कागदपत्रांचे शुल्क वाढविण्यात आल्याने आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठा फटका बसत आहे,

# तणनाशक फवारणीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल!

## पारंपारिक निंदणाकडे पाठ ; सर्वाधिक फटका मजुरांना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ मोर्शी-**

समाधानकारक पावसामुळे खरीप पिकांना संजीवनी मिळत आहे. मात्र, शेतांमध्ये तण वाढू लागल्याने तण नियंत्रणाची कामे वेगात सुरू आहेत. वाढती मजुरी, वेळेवर मजूर उपलब्ध न होणे आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकरी पारंपारिक निंदणाऐवजी तणनाशक फवारणीला प्राधान्य देत असल्याचे चित्र लाखनी तालुक्यातील मोर्शी शिवारात पाहायला मिळत आहे.सध्या शेतमजुरांचे रोजंदारीचे दर ४०० ते ५०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. एका एकरात निंदणीसाठी पाच ते सहाहजार रुपयांपर्यंत खर्च येतो, असे शेतकरी सांगत आहेत. तणनाशक फवारणीसाठी अवघा दीड ते दोन हजार रुपयांचा खर्च होत असल्याने अनेक शेतकरी हा पर्याय स्वीकारत आहे.

सध्या आवत्या पिकांमध्ये तणनाशक फवारणीची लगबग सुरू असून, शेतकरी कामात व्यस्त आहेत.रिमझिम पावसाने पिकात अनावश्यक गवत, केरकचऱ्याची वाढ होत असल्याने वेळेत तण नियंत्रण करणे आवश्यक बनले आहे.

शेतकरी शेतात पेरणीपासून ते काढणीपर्यंत पिकांची काळजी घेतो. मात्र, वाढता उत्पादन खर्च त्यातच मजुरांची आणि कमतरता बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेती करणे दिवसेंदिवस आव्हानात्मक बनत आहे. उपलब्ध परिस्थितीत खर्चाची बचत करण्यासीगी तणनाशक फवारणीचा पर्याय शेतकरी मोठ्या प्रमाणावर स्वीकारत आहेत. तणनाशक फवारणीच्या वाढत्या वापराचा सर्वाधिक फटका मजुरांना बसत आहे. कलर बॉक्स धुऱ्यावर तणनाशकाचा वापर धोकादायकशेतकरी वर्ग धानाच्या बांधीच्या धुऱ्यांवरील गवत मारण्यासाठी तणनाशकांचा वापर करीत आहेत. या केमिकलमुळे गवत नष्ट होऊन पावसाचे पाणी थेट मातीवर पडते. ज्यामुळे धुरे-पारे खचत आहेत. शिवाय, हे औषध पाण्यात मिसळल्याने शेतातील पाणीसुद्धा दूषित होत आहे. कृषी विभागाकडून याबाबत जनजागृती केली जात असली, तरीही तणनाशकाचा वापर दिवसेंदिवस वाढतच चालला आहे यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे.

# तिवस्यातील बेमुदत अन्नत्याग आंदोलनाची सांगता

## भारतरत्नासाठी लोकसभेत पाठपुरावा करण्याचे खासदारांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ तिवसा** – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, या मागणीसाठी तिवसा तहसील कार्यालय परिसरात ९ ऑगस्ट क्रांती दिनापासून सुरू असलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाची १३ ऑगस्ट रोजी तात्पुरती सांगता करण्यात आली. अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. त्यांच्या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांनी खासदारांच्या हस्ते शरबत प्राशन करून आंदोलनाची सांगता केली. खासदार बळवंत वानखडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्न मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार करण्यासोबतच लोकसभेत हा विषय उपस्थित करून प्रभावी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. येत्या अधिवेशनात यासंदर्भात प्रश्न उपस्थित करून भारतरत्न पुरस्काराची घोषणा होईपर्यंत या मागणीसाठी पाठपुरावा सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी दिली.

तिवसा येथे सुरू असलेल्या आंदोलनाचा उल्लेख करून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात येईल. तसेच पुरस्काराच्या मागणीसंदर्भात केंद्र सरकारसोबत चर्चेसाठी उपोषणकर्त्यांना बोलावण्यासाठीही प्रयत्न करण्यात येतील, असे खासदार वानखडे यांनी सांगितले.दरम्यान, आमदार राजेश वानखडे यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिवसा तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा उल्लेख करून पत्र पाठविले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल तसेच आगामी



हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला जाईल, असे आश्वासन देण्यात आले.खासदार, आमदार, प्रशासन तसेच उपस्थित गुरुदेव भक्तांच्या विनंतीला मान देत आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय उपोषणकर्त्यांनी जाहीर केला. त्यानंतर खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना शरबत पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली. पाच दिवसांच्या आंदोलनामुळे उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली९ ऑगस्टपासून सुरू असलेल्या या आंदोलनात गुरुदेव भक्त मुकुंद पुनसे, रमेश बोके, जयकुमार बोके, मनोहर साबळे, हैबतराव गाडगे, जगनराव साबळे आणि सफिक शहा यांनी बेमुदत अन्नत्याग केला. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी प्रशांत कांबळे, मनोज दिगंबर, दिनेश भोंबे, निर्मला लांजेवार, पुंडलिक आढाऊ, धनराज लव्हाळे, नरेश भोयर, सचिन ढोरे आणि नितीन कुबडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते साखळी उपोषणात सहभागी झाले होते.सलग चार दिवस अन्नत्याग केल्याने काही उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली होती. प्रशासनाने याची दखल घेत सकाळी नायब तहसीलदार नरेंद्र कुरडकर व अमोल देशमुख यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांची विचारपूस केली. यावेळी त्यांची वैद्यकीय तपासणीही करण्यात आली. तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, गुरुदेव भक्त आणि सामाजिक कार्यकर्ते आंदोलन स्थळी उपस्थित होते.आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले तरी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना 'भारतरत्न' मिळेपर्यंत लोकशाही मार्गाने पुढील काळात पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

# पांदन रस्त्यांनी शेतकऱ्यांची वाट झाली सुकर

## वरुड तालुक्यात रोजगार हमी योजना ठरली वरदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४वरुड** वरुड तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात पांदन रस्त्यांची कामे करण्यात आल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. वर्षानुवर्षे पावसाळ्यात चिखल, खड्डे आणि खराब रस्त्यांमुळे शेतात जाण्यासाठी होणारी कसरत आता अनेक गावांमध्ये कमी झाली असून, शेतीची कामे करणे अधिक सोयीचे झाले आहे.तालुक्यातील विविध गावांमध्ये शेतरस्ते व पांदन रस्त्यांची कामे झाल्याने शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी सुलभ मार्ग उपलब्ध झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात शेतमाल, खते, बियाणे तसेच शेतीची अवजारे शेतापर्यंत ने-आण करताना



शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. खराब पांदन रस्त्यांमुळे अनेक वेळा ट्रॅक्टर व इतर वाहने शेतात पोहोचणे कठीण होत असे. मात्र रस्त्यांची कामे झाल्याने ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

### शेतीचा खर्च आणि वेळही वाचला

पांदन रस्ते सुस्थितीत झाल्यामुळे ट्रॅक्टर, बैलगाडी तसेच अन्य वाहने थेट शेतापर्यंत पोहोचू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि वाहतुकीचा खर्च वाचण्यास मदत होत आहे. पावसाळ्यात शेतीच्या कामांना वेग देण्यासाठी या रस्त्यांचा मोठा फायदा होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

**रोजगार हमी योजनेतून विकासाला चालना** महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे एकीकडे ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराची संधी मिळत आहे, तर दुसरीकडे गावातील मूलभूत सुविधांच्या विकासालाही चालना मिळत आहे. पांदन रस्त्यांसारखी कामे झाल्याने सार्वजनिक सुविधा निर्माण होण्याबरोबरच शेतीला थेट फायदा होत असल्याने ही योजना शेतकऱ्यांसाठीही महत्त्वपूर्ण ठरत आहे.

तालुक्यातील उर्वरित खराब पांदन रस्त्यांचीही पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी कामे करण्यात यावीत, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. पांदन रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने करून त्यांची नियमित देखभाल केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि शेती व्यवसायाला आणखी मोठी चालना मिळू शकते.रोजगारही आणि शेतकऱ्यांच्या विकासालाही हातभार अशी दुहेरी भूमिका बजावत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना वरुड तालुक्यात ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे चित्र आहे.

# निकालच जाहीर केला नाही तरी 'सर्वाधिक गुण' मिळाल्याचा दावा नेमका कशाच्या आधारावर?

## आमरण उपोषणाच्या धमकीने ग्रामपंचायतीवर दबाव आणण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४वरुड,**

जामगाव खडका ग्रामपंचायतीच्या शिपाई पदभरतीचा तब्बल दोन वर्षांपासून सुरू असलेला वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे. सन २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप करीत जवळपास २० उमेदवारांनी ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत ग्रामपंचायतीने मासिक सभेत बहुमताने ठराव पारित करून सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.भरती प्रक्रिया अधिकृतरीत्या रद्द झाल्यानंतरही त्यातील उमेदवार दीक्षित वानखडे हे गेल्या दोन वर्षांपासून आपल्याला परीक्षेत सर्वाधिक गुण मिळाले असून आपली शिपाई पदावर नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करीत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता या संपूर्ण प्रकरणाभोवती अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.विशेषतः परीक्षेचा अधिकृत निकालच जाहीर झाला नसताना 'मला सर्वाधिक गुण मिळाले' असा दावा नेमका कोणत्या आधारावर केला जात आहे? हा प्रश्न या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा ठरत असून, याची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू आहे.

'निकालच नाही, मग सर्वाधिक गुणांची माहिती कशी?'

पेपरफुटीच्या तक्रारीनंतर भरती प्रक्रिया रद्द करण्याचा ग्रामपंचायतीने बहुमताने निर्णय घेतला. त्यामुळे त्या परीक्षेचा निकाल अधिकृतपणे जाहीर झाला नसल्यास, एखाद्या उमेदवाराला आपले गुण किंवा आपण सर्वाधिक गुण मिळविल्याची माहिती कशी मिळाली, याचा शोध घेणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.या दाव्यामुळे परीक्षा प्रक्रिया, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, तपासणी प्रक्रिया तसेच गुणांची नोंद याबाबत पारदर्शक चौकशीची मागणी पुढे येत आहे.

### महिला सरपंचावर दबाव आणण्याचा आरोप

ग्रामपंचायतीच्या निर्णयानुसार भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने पदभरती करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. मात्र, या निर्णयाला विरोध करीत संबंधित उमेदवाराकडून ग्रामपंचायतीवर दबाव आणला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. एवढेच नव्हे तर आदिवासी समाजातील महिला सरपंच असल्याचा गैरफायदा घेत त्यांच्यावर मानसिक दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून केला जात आहे.दबावाला बळी न पडल्यास आमरण उपोषण करण्याची धमकी दिली जात असल्याने ग्रामपंचायत प्रशासनासमोरही पेच निर्माण झाला आहे.

### ग्रापं.चा स्पष्ट निर्णय : नव्याने भरती होणार

पेपरफुटीच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आणि भरती प्रक्रियेबाबत निर्माण झालेल्या संशयाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने सदर भरती रद्द करण्याचा ठराव घेतला आहे. त्यामुळे आता पूर्वीच्या परीक्षेच्या आधारे नियुक्ती करण्याऐवजी नियमानुसार नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याची भूमिका ग्रामपंचायतीने स्पष्ट केली आहे.या प्रकरणात कोणत्याही व्यक्तीवर अन्याय न होता, नियमबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने भरती प्रक्रिया पार पडावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.मात्र, 'निकाल जाहीरच झाला नाही तर सर्वाधिक गुण मिळाल्याचे कसे कळले?' या प्रश्नाचे उत्तर मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, संबंधित बाबींची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याची मागणी जोर धरत आहे.

# जुना धामणगावच्या पाटबंधारे कार्यालयात कर्मचारी गैरहजर

## शेतकऱ्यांची कामे रखडली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४धा.रेल्वे** धामणगाव रेल्वे तालुक्यातील जुना धामणगाव येथील उर्ध्व वर्धा पाटबंधारे उपविभाग क्रमांक ३ मध्ये कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कार्यालयात बहुतांश कर्मचाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्या आढळून आल्याने पाटबंधारे विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, या कार्यालयात एकूण १३ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, पाहणीदरम्यान कार्यालयात केवळ दोन ते तीन कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे कार्यालयातील थंब मशीनदेखील बंद असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कर्मचारी कार्यालयात नियमित उपस्थित राहतात की नाही, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.पाटबंधारे विभागाशी संबंधित विविध कामांसाठी शेतकऱ्यांना या कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागतात. मात्र अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपलब्ध




नसल्याने शेतकऱ्यांची कामे रखडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सिंचन, पाणीवाटप आणि इतर प्रशासकीय कामांसाठी आलेल्या शेतकऱ्यांना कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीचा फटका बसत असल्याचे सांगितले जात आहे.कार्यालयीन वेळेत कर्मचारी गैरहजर असताना हजेरीपटावर त्यांची उपस्थिती नोंदविली जात असल्यास ही बाब अधिक गंभीर ठरणार आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.या प्रकाराची दखल घेऊन सिंचन विभागाचे मुख्य अभियंता संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करतात, याकडे आता शेतकऱ्यांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# ४ महिन्यांत ८ रुपयांनी महागला सीएनजी

## प्रतिकिलो १०३.७८ रुपये दर, प्रथमच ओलांडली शंभरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती** मागील काही महिन्यांपासून जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीसोबतच आता



सीएनजीच्या वाढत्या दरामुळे वाहनधारकांवर आर्थिक बोजा पडत आहे. शहर व जिल्ह्यात हजारो वाहने सीएनजीवर धावत असून, गेल्या चार महिन्यांत सीएनजीच्या दरात प्रतिकिलो तब्बल आठ रुपयांची वाढ झाली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यात सीएनजीचे मदर स्टेशन सुरू होऊनही ही दरवाढ झाल्याने वाहनधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.जिल्ह्यात सुमारे अडीच वर्षांपासून सीएनजीचा पुरवठा सुरू आहे. पेट्रोल आणि डिझेलला पर्याय म्हणून सीएनजी उपलब्ध झाल्याने जिल्ह्यात सीएनजीवर धावणाऱ्या वाहनांची संख्या सातत्याने वाढली आहे. सध्या ही संख्या सुमारे ३२०० वाहनांवर पोहोचली आहे. सुरुवातीला सीएनजीचा दर प्रतिकिलो ९० रुपये होता. त्यानंतर सुमारे वर्षभर दरात कोणतीही वाढ झाली नाही. मात्र, त्यानंतर हळूहळू सीएनजीच्या दरात वाढ होण्यास सुरुवात झाली.पूर्वी अमरावतीला सीएनजी लातूर जिल्ह्यातून टँकरद्वारे आणला जात होता. त्यामुळे वाहतूक खर्चाचा अतिरिक्त भार पडत होता. मात्र, गेल्या सात महिन्यांपासून नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील बोरी येथे सीएनजीचे मदर स्टेशन सुरू झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातच सीएनजीचा पुरवठा उपलब्ध झाला असून, शहरापासून हे मदर स्टेशन सुमारे ४५ ते ५० किलोमीटर अंतरावर आहे. मदर स्टेशन जिल्ह्यात सुरू झाल्यानंतर सीएनजीचे दर कमी होतील, अशी अपेक्षा होती. अदानी टोटल गॅसच्या अधिकाऱ्यांकडूनही सुरुवातीला वाहतूक खर्च कमी झाल्याने त्याचा फायदा दरांमध्ये होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात दर कमी होण्याऐवजी त्यात सातत्याने वाढ झाली आहे. त्यामुळे सीएनजीवर अवलंबून असलेल्या वाहनचालकांच्या खर्चात वाढ झाली आहे. मूळ किमतीत वाढ झाल्यामुळे दर वाढले केंद्र सरकारने देशपातळीवर सीएनजीच्या मूळ किमतीत वाढ केली आहे. त्यामुळेच जिल्ह्यातही सीएनजीचे दर वाढले आहेत. – योगेशकुमार पारधी, प्रमुख, विदर्भ, अदानी टोटल गॅस. सीएनजीवर धावणाऱ्या वाहनांची संख्या

अशा प्रकारे अवघ्या चार महिन्यांत सीएनजीच्या दरात प्रतिकिलो ८ रुपयांची वाढ झाली असून, सीएनजीने प्रथमच प्रतिकिलो १०० रुपयांचा टप्पा ओलांडला आहे.

# कापूसतळणीचा रस्ता बनला मृत्यूचा सापळा

## उघड्या सळाखींनी अपघाताला निमंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४कापूसतळणी–** येथील बसस्थानकावरून गावात प्रवेश करणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून, जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील सिमेंटची झीज होऊन सळाखी उघड्या पडल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे हा मार्ग तातडीने दुरुस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वी लोकप्रतिनिधींच्या निधीतून एका टप्प्यात बसस्थानक ते गावातील मुख्य वस्तीपर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र, देखभालीअभावी या रस्त्याची अवस्था आता अत्यंत खराब झाली आहे. जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, रस्त्याच्या पृष्ठभागावरील सळाखी उघड्या पडल्या आहेत. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्त्यात खड्डा की



खड्ड्यात रस्ता, हेच समजत नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. उघड्या सळाखींमुळे गंभीर अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. बसस्थानक ते गावातील हा मार्ग पुढे माळीपुऱ्यातून कसबेगव्हाण व इतर गावांकडे जातो. त्यामुळे या रस्त्यावर ग्रामीण भागातील वाहनधारक तसेच शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. माळीपुऱ्यातील रस्त्याची अवस्थाही खराब झाली आहे. अंजनगावसुर्जी तालुक्यात लोकसंख्येच्या दृष्टीने कापूसतळणी हे मोठे गाव असून, अधिकारी व पदाधिकाऱ्यांचीही या मार्गावरून नियमित ये-जा असते. असे असतानाही मुख्य रस्ता दुर्लक्षित राहिल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, ग्रामपंचायतचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर निवडणूक न झाल्याने प्रशासकीय व्यवस्था सुरू आहे.

# IAS सत्यम गांधी: करिअरसाठी १८-२५ वय महत्त्वाचे मित्र निवडा, सोशल मीडिया टाळा; आयुष्याचे पैलू उलगडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–**

आयएएस सत्यम गांधी यांनी आपल्या स्वानुभवातून तरुणांना करिअर आणि आयुष्याबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन केले आहे. वयाच्या २२ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात आयएएस झालेले गांधी म्हणाले की, करिअरसाठी १८ ते २५ हा वयोगट अत्यंत महत्त्वाचा आहे. या काळातच काहीतरी मोठे साध्य करता येत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे 'मीट द प्रेस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी पत्रकारांसोबत मनमोकळा संवाद साधला.

गांधी यांनी सांगितले की, त्यांनी वयाच्या १८ वर्षांपर्यंत एकाच शाळेत शिक्षण घेतले. त्यानंतर पदवी मिळवून दिल्लीत यूपीएससीची तयारी केली. सतत शिकण्याची जिद्द, उद्दिष्टांप्रती सतर्कता आणि काहीतरी नवीन करण्याची खुणगाठ यामुळे त्यांना यश मिळाले. सध्या ते अमरावती जिल्हा परिषदेचे सीईओ म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी पालघरमध्ये एसडीओ आणि प्रकल्प संचालक, तसेच सांगली महापालिकेचे आयुक्त म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे.

त्यांच्या शैक्षणिक प्रवासासाठी



कुटुंबावर १५ लाख रुपयांचे कर्ज झाले होते. आजोबा आणि वडिलांनी यासाठी खूप कष्ट घेतले. मात्र, नोकरीच्या सुरुवातीच्या काळातच त्यांनी हे कर्ज फेडून कुटुंबाला कर्जमुक्त केले, असेही गांधी यांनी नमूद केले.गांधी यांच्या कुटुंबात अभियंता आणि डॉक्टर असले तरी आजोबांना एक आयएएस अधिकारी असावा अशी इच्छा होती. शालेय जीवनापासूनच ते सत्यम गांधींमध्ये एक अधिकारी शोधत होते. जेव्हा ते पहिल्यांदा अधिकारी म्हणून सरकारी वाहनातून घरी गेले, तेव्हा आजोबांना खूप आनंद झाला. त्यांच्या स्वागताला अधिकारी आणि सुरक्षारक्षक पाहून आजोबांच्या भावना अवर्णनीय होत्या, असे गांधी यांनी सांगितले.

तरुणांना मार्गदर्शन करताना गांधी यांनी इन्स्टाग्राम आणि रील्ससारख्या सोशल मीडियापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. विशेषतः १८ ते २५ या वयोगटातील तरुणांनी पुस्तके आणि वर्तमानपत्रांशी नाते जोडावे. रात्री उशिरापर्यंत जागे राहून वेळ वाया घालवण्याऐवजी वेळेत झोप घ्यावी आणि झोपण्यापूर्वी दिवसाचा दिनक्रम लिहून त्यातील टाळण्याजोग्या गोष्टींवर दुसऱ्या दिवशी मात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

गांधी यांनी एक भावनिक प्रसंगही सांगितला. ते आयएएस झाल्यानंतर त्यांच्या ९९ वर्षीय आजोबांनी 'माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या' असे सांगत अन्नत्याग सुरू केला. १६ दिवसांनी त्यांचे निधन झाले. आजोबांना कोणताही आजार नव्हता, मात्र त्यांच्या शेवटच्या क्षणी आपण त्यांच्याजवळ नव्हतो, ही बोच त्यांना आजही सतावत आहे, असे त्यांनी म्हटले.



# डोमा आश्रमशाळेत शिक्षणाचा बोजवारा

## जीवशास्त्राला शिक्षकच नाही, विद्यार्थी डेक्सबेंचविनाच!









### गगंभीर प्रकरणावर नेते मंडळींचे ही दुर्लक्षच!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी डिजिटल लॅब, अत्याधुनिक प्रयोगशाळेचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचे प्रयत्न सुरू असताना, दुसरीकडे डोमासारख्या मोठ्या आश्रमशाळेमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना 'जीवशास्त्र' हा विषय शिकविण्यासाठी वर्षभरापासून शिक्षक उपलब्ध नसल्याचे धक्कादायक वास्तव पुढे आले आहे. निवासी शिक्षणासाठी असलेल्या नववी ते अकरावीच्या काही विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये आठवड्यापूर्वी झालेल्या बदलामुळे डोमा ही आश्रमशाळा रिकामी झाली होती. तेव्हापासून येथील व्यवस्था अधिकच चर्चेत आली आहे.

वर्ग एक ते १२ मध्ये एकूण ८५२ मुले-मुली शिक्षण घेतात. त्यापैकी ६१० विद्यार्थी निवासी स्वरूपात येथे राहतात. त्यात २६३ मुले, तर ३४७ मुलींचा समावेश आहे.

तर बाहेरून शिक्षणासाठी येणाऱ्या मुलामुलींची एकूण संख्या १२६ च्या घरात असून, त्यात ६५ मुले आणि ६१ मुलींचा समावेश आहे. डोमा आश्रमशाळेमध्ये केवळ नऊ ते १२ व्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी वर्गखोल्यांमध्ये डेक्सबेंच प्रशासनाने उपलब्ध करून दिले असून, वर्ग एक ते आठवीमध्ये शिक्षणाऱ्या मुलामुलींना फाऱ्यांवरच बसून धडे गिरवावे लागत असल्याचे वास्तव येथील भेटीदरम्यान बघायला मिळाले. बारावीच्या 'जीवशास्त्र' याविषयात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून कंत्राटी तत्त्वावर एका शिक्षकाची नियुक्त केली होती. परंतु ते फारकाळ टिकले नाहीत. त्यामुळे याविषयाच्या शिक्षकाचे पद रिक्तच आहे, असे मुख्याध्यापकांनी सांगितले. केवळ डोमा आश्रमशाळेमध्येच नव्हे तर मेळघाटातील बहुतांश शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये अशाच अवस्थेत विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. डिजिटल लॅबचे चित्र प्रत्यक्षात उतरविण्यासाठी धारणी प्रकल्प कार्यालयांतर्गत प्रशस्त अशा अत्याधुनिक पाच डिजिटल लॅबच्या इमारती उभ्या करण्यात आल्या आहेत, तर दुसरीकडे बसण्याकरिता वर्गखोल्यांत अर्ध्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना डेक्स-बेंचची मूलभूत सुविधासुद्धा नाही.तर या परिसरातील नेते मंडळी जिल्ह्याचे खासदार ही या गंभीर विषयाकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याचे बोलल्या जात आहे.

> **जारिदा आश्रमशाळेत समस्या कायम**
>
> डोमा गावापासून जवळच असलेल्या जारिदा येथील शासकीय आश्रमशाळेची इमारत १९७२ ची असून, ५५ वर्षे होत आली आहेत. येथेही एक हजारांवर विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यात ४७५ मुले आणि ५२६ मुलींच्या समावेश आहे. त्यापैकी ३५९ मुले व ४१० मुली निवासी स्वरूपात आहेत. येथेही माध्यमिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत. नवीन इमारतीचे बांधकाम बाजूलाच सुरू आहे. शाळेची नवीन इमारत पूर्ण व्हायला सहा महिन्यांचा कालावधी जाऊ शकतो. येथेही 'भौतिकशास्त्र' विषय शिकवायला शिक्षक नाहीत.

# बुलढाणा जिल्ह्यातील युवक अमरावतीत टॉवरवर चढला

## सारंगपूर ग्रामपंचायत विरोधात आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती-**



बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील सारंगपूर ग्रामपंचायतीच्या कथित मनमानी, बेजबाबदार आणि गैरकारभाराविरोधात तसेच गावातील विविध प्रलंबित नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तक्रारकर्ते तथा आंदोलनकर्ते गजानन बोरकर विभागीय आयुक्त कडे तक्रार दिली होती मात्र सध्या काहीच कारवाई झाली नाही त्यामुळे, अमरावती शहरातील सातूर्णा परिसरात मोबाईल टावर वर चढून आंदोलनास सुरुवात केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून हे आंदोलन सुरू असून ५० फूट पर्यंत हा तरुण वर बसला आहे, मला अडवल तर मी गळफास घेऊन आत्महत्या करणार असं या तरुणाने सांगितलं, कारण तो दोर घेऊन टॉवरवर चढला आहे.सारंगपूर ग्रामपंचायतीशी संबंधित विविध अभिलेख व रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्यासाठी ते तातडीने सील करण्याची मागणी करण्यात आली आहे. सरपंच, ग्रामसेवक, गटविकास अधिकारी तसेच विस्तार अधिकारी यांनी अभिलेख व रेकॉर्ड सील करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली का, याची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.गावकऱ्यांना मूलभूत पाणीपुरवठा व्यवस्थित उपलब्ध करून देणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी असून, या प्रश्नावर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# एरंडगावचा रस्ता की मृत्यूचा सापळा? विद्यार्थ्यांसह शेतकरी त्रस्त ; १५ ऑगस्टला आत्मदहनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४दर्यापूर-** देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक दशके उलटली, मात्र ग्रामीण भागातील रस्त्यांच्या समस्या आजही कायम असल्याचे चित्र दर्यापूर तालुक्यात पाहायला मिळत आहे. दर्यापूर तालुक्यातील एरंडगाव येथील रस्त्याची अवस्था गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत खराब असून, याचा मोठा फटका विद्यार्थी, शेतकरी, वाहनचालक आणि ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे.पावसाळ्यात या रस्त्याची परिस्थिती आणखी बिकट होते.



रस्त्यावर चिखल आणि खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. शेतकऱ्यांना शेतात जाणे-येणे कठीण झाले असून वाहनचालकांनाही जीव मुठीत घेऊन या मार्गावरून प्रवास करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.विशेष म्हणजे, दरवर्षी याच मार्गावरून तब्बल ६० ते ७० गजानन महाराजांच्या पालख्या शेगावकडे जात असल्याचे सांगण्यात येते. धार्मिक आणि महत्त्वाच्या वाहतुकीच्या या मार्गाकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.या रस्त्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एरंडगाव येथील रहिवासी भूषण चौखंडे यांनी येत्या १५ ऑगस्ट रोजी आत्मदहन करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे आता प्रशासन या गंभीर प्रश्नाची दखल घेणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

# जेन झी आणि जेन अल्फाच्या खांद्यावरच प्रधानमंत्र्यांच्या 'विकसित भारता'ची धुरा

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला खा. डॉ.अनिल बोंडे यांचा दर्यापुरात तरुणाईशी संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४दर्यापूर** देशाच्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला हर घर तिरंगा अभियानांतर्गत दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयात भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी 'जेन झी' (ऋाप न) आणि 'जेन अल्फा' (ऋाप -श्रहिर) या नवोदित पिढीसोबत अत्यंत आपुलकीने आणि त्यांच्याच भाषेत थेट संवाद साधला. देशाचा स्वातंत्र्यदिन साजरा करत असताना, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील '२०४७ चा समृद्ध आणि विकसित भारता'चे स्वप्न साकार करण्याची खरी जबाबदारी आजच्या युवा पिढीच्या खांद्यावरच आहे, असे प्रतिपादन यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी केले.स्वातंत्र्याच्या अमृतकाळात देशाचे भविष्य घडवण्यासाठी नवोदित पिढीने पुढे यावे, असे आवाहन करत त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या तंत्रज्ञान, शिक्षण आणि तरुणांसाठीच्या विविध योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.या प्रसंगी प्रबोधन विद्यालयाचे चेअरमन जयसिंग देशमुख, विश्वस्त ड. संतोष धर्माधिकारी, भालचंद्र कोरपे, माधव बुरघाटे, धनंजय गणोरकर, प्रभाकर कोरपे, आदित्य देशमुख, आदित्य धर्माधिकारी, किशोर गणोरकर, दिलीप देशमुख, सतीश देशमुख, कार्तिक देशमुख, विजय मुळे, भाजपा अल्पसंख्याक



आघाडीचे प्रदेश नेते सलीम घानिवाले, भाजपा शहराध्यक्ष मेघा भारती, रवींद्र ढोकणे, गटनेते दिनेश पारडे, कृष्णा स्वामी, नगरसेवक रोशन कट्यारमल, आरती वाबळे यांच्यासह शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### राज्य सभेचे विरोधी पक्षनेते

# मल्लिकार्जुन खरगे यांची सभा झालेल्या मंचाचे शुध्दीकरण, हा देशाचा अपमान - किशोर बोरकर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्द्वानी (उत्तराखंड) येथील रामलीला मैदानावरील सभेनंतर त्यांनी उपस्थिती लावलेल्या मंचाचे कथित शुद्धीकरण करण्यात आल्याच्या घटनेचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी तीव्र निषेध केला आहे. खरगे हे दलित समाजाचे असल्यामुळे जातीय मानसिकतेतून हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.ही घटना मानवतेला काळीमा फासणारी असून, आधुनिक भारताच्या प्रगतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून देशात समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये रुजविली. मात्र, अशा घटनांमुळे समतेच्या विचाराला धक्का बसत असल्याची खंत बोरकर यांनी व्यक्त केली.स्वातंत्र्याच्या दशकांनंतरही जातीय भेदभावाच्या मानसिकतेतून असे प्रकार घडत असतील, तर देश प्रगतीऐवजी मागे जात असल्याचेच म्हणावे लागेल, अशी टीका त्यांनी केली. या घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केंद्राच्या गृह विभागाकडे करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व राष्ट्रीय रिपाइं खोब्रागडे गटाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे बोरकर यांनी सांगितले .यावेळीपी.एस खडसे,अशोक डोंगरे ,बी आर देशमुख,वंदना कंगाले, भय्यासाहेब नीचळ, प्रा. गोपीचंद मेश्राम,समीर जवंजाळ, डॉ.सुजाता झाडे, वैभव देशमुख,रमेश रामटेके, अनिल,देशमुख श अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.















जाहिरात संकलन- सुनील घोरमाडे, तिवसा तालुका प्रतिनिधी, मो. नं. ९७६७३३९९०९


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :